# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# पुणे वृत्तांत
# वेळ - संध्याकाळी 06.00 वा.

**दिनांक- 30.07.2024** **वार – मंगळवार**

---

**लाडकी बहीण**

राज्य सरकारच्या मुख्यमंत्री लाडकी बहीण योजनेसाठी पिंपरी चिंचवड महानगरपालिका क्षेत्रातील 1 लाख 18 हजाराहून अधिक महिलांचे अर्ज जमा झाले आहेत. यामध्ये 62 हजार 878 अर्ज ऑनलाईन तर 55 हजार 508 अर्ज ऑफलाईन पद्धतीनं दाखल झाले आहेत. महाराष्ट्र आर्थिक विकास महामंडळाच्या मदतीने पिंपरी चिंचवड महानगरपालिकेनं 'प्रकल्प सिद्धी' हा उपक्रम राबवण्यात येत आहे. या उपक्रमाअंतर्गत 300 महिला सदस्य माझी लाडकी बहीण योजनेतील लाभार्थींच्या घरोघरी जाऊन त्यांना अर्ज भरण्यासाठी मदत करत आहेत.

**PCMC**

पिंपरी चिंचवड महापालिकेच्या वतीने राबवण्यात येणाऱ्या विविध योजना आणि उपक्रमांची माहिती लोकांपर्यंत पोहोचवणाऱ्या विविध क्षेत्रातील सदिच्छा दूतांचा सत्कार आयुक्त शेखर सिंह यांच्या हस्ते नुकताच करण्यात आला. मालमत्ता कर सवलत योजनेच्या प्रसिद्धीसाठी, तसंच आयुर्वेद आणि पर्यावरण संवर्धनासह विविध योजनांचा प्रचार प्रसार करण्यासाठी महापालिकेनं सदिच्छा दूत नेमले आहेत.

**ससून**

ससून सर्वोपचार रूग्णालयात जागतिक कावीळ दिनानिमित्त जनजागृती फेरी काढण्यात आली. याचं उद्घाटन ससूनचे अधिष्ठाता डॉक्टर एकनाथ पवार यांनी केलं. राष्ट्रीय कावीळ नियंत्रण उपक्रमांतर्गत निदान, उपचार आणि लसीकरण नियमितपणे सुरू आहे; नागरिकांनी या सुविधेचा लाभ घ्यावा, असं आवाहन पवार यांनी केलं.

**पुणे वाहन**

पुणे शहरातील वाहनसंख्या या महिना अखेरपर्यंत 38 लाख 63 हजार झाली आहे. इलेक्ट्रिक वाहनाच्या खरेदीतही वाढ झाली आहे. वाढत्या वाहनसंख्येमुळे रस्त्यावरचा भार वाढत असून वाहतूक कोंडीबरोबरच प्रदूषणाचा प्रश्नही गंभीर होत आहे, असं निरीक्षण पुणे महापालिकेच्या पर्यावरण सद्यस्थिती अहवालात नोंदवण्यात आलं आहे. पीएमपीच्या इलेक्ट्रिक, सीएनजी बसने वायू आणि ध्वनी प्रदूषणात काही प्रमाणात घट झाली असली तरी गेल्या वर्षी शिवाजीनगर इथं सर्वाधिक प्रदूषणाची नोंद झाली आहे. पुणेकर नागरिक पर्यावरणाबाबत जागरूक असून इलेक्ट्रिक वाहन आणि सौरऊर्जेचा वापर करत असल्याचं देखील या अहवालात म्हटलं आहे.

**भाजपा मागणी**

लोकसभा निवडणुकीसाठी तयार करण्यात आलेल्या मतदार याद्यांमध्ये गंभीर त्रुटी असल्याने पुण्यातील आठही विधानसभा मतदारसंघात असंख्य मतदार मतदानाच्या हक्कापासून वंचित राहिले. त्यामुळे विधानसभा निवडणुकीपूर्वी लोकसभा निवडणुकीच्या मतदार याद्यांतील दोष दूर करावेत, अशी मागणी भारतीय जनता पार्टीच्या पुणे शहराच्या शिष्टमंडळाने काल जिल्हाधिकारी सुहास दिवसे यांच्याकडे केली. मतदार प्रारुप याद्या देखील लवकरात लवकर प्रसिद्ध कराव्यात अशीही मागणी

यावेळी करण्यात आली. मंत्री चंद्रकांत पाटील, आमदार माधुरी मिसाळ, भीमराव तापकीर, सिद्धार्थ शिरोळे, योगेश टिळेकर, भाजपा पुणे शहर अध्यक्ष धीरज घाटे, प्रदेश उपाध्यक्ष राजेश पांडे यांच्यासह भाजपचे सर्व प्रमुख पदाधिकारी यावेळी उपस्थित होते.

**<u>इशारा मोर्चा</u>**

साखर कारखाने आणि जोडधंद्यातील कामगारांना पगार देण्याच्या प्रमुख मागणीकडे सरकारचं लक्ष वेधण्यासाठी येत्या 7 ऑगस्ट रोजी साखर आयुक्तालयावर 'इशारा मोर्चा' काढणार असल्याचं राज्य साखर कामगार प्रतिनिधी मंडळाने सांगितलं आहे. कामगारांना वेतन आणि सेवाशर्ती ठरवण्यासाठी त्रिपक्षीय समिती स्थापन करण्याची मागणीही संघटनेनं केली आहे.

**<u>चर्चासत्र</u>**

प्राप्तिकर विवरणपत्र सादर करण्याबाबत मार्गदर्शन करण्यासाठी पुण्याच्या सरस्वती मंदिर रात्र महाविद्यालयात काल एका चर्चासत्राचं आयोजन करण्यात आलं होतं. यावेळी प्राप्तीकर विभागाच्या पुणे कार्यालयातील अधिकारी वकील हकीम यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केलं.

**<u>आयएमडीआर</u>**

डीईएसच्या 'इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट डेव्हलपमेंट अँड रिसर्च संस्थेत' उद्योजकता विकास या विषयावर एक कार्यशाळा घेण्यात आली. यामध्ये सोहम दादरकर यांनी उद्योग, स्टार्टअप, युनिकॉर्न या संकल्पना नाट्यप्रयोगाच्या सादरीकरणातून स्पष्ट केल्या. उद्योजिका अनिता क्षेत्री, राघवेंद्र पोंक्षे, सिद्धार्थ रुणवाल यांनी परिसंवादात सहभाग घेतला.

**<u>अनधिकृत हॉटेल</u>**

पुण्याच्या कल्याणीनगर भागात झालेल्या पोर्शे वाहन अपघातानंतर शहर आणि परिसरातील बेकायदा पब आणि हॉटेलवर स्थानिक प्रशासनानं कारवाई सुरु केली आहे. सुमारे 200 अनधिकृत हॉटेलची यादीच जाहीर करण्यात आली असून काही हॉटेल आणि पबवर कारवाई झाली आहे; उर्वरित हॉटेल चालकांनी स्वतःहून अनधिकृत व्यवसाय बंद करावा अथवा स्थानिक प्रशासनाकडून व्यवसाय चालवण्यासाठीचे आवश्यक ते सर्व परवाने घ्यावेत, असं आवाहन करण्यात आलं आहे.

जिल्ह्याच्या मावळ, मुळशी आणि हवेली तालुक्यात मोठ्या प्रमाणावर अनधिकृत हॉटेल व्यवसाय सुरू आहेत. त्यांच्याविरुद्धची ही कारवाई काही कालावधीसाठी थांबवण्याचं निवेदन नुकतंच स्थानिक हॉटेल व्यावसायिकांनी PMRDA आयुक्त योगेश म्हसे यांना दिलं आहे. या काळात आपल्या व्यवसायासाठी आवश्यक त्या सर्व परवानग्या घेण्याची हमी या व्यावसायिकांनी दिली आहे.

**<u>हवामान</u>**

पुणे आणि परिसरात आज अधूनमधून पावसाच्या मध्यम सरी बरसत आहेत. दिवसभर ढगाळ वातावरण होतं. उद्याही शहर आणि परिसरात असंच हवामान असेल; तर घाटक्षेत्रात काही ठिकाणी मुसळधार पाऊस पडेल, असा अंदाज पुणे वेधशाळेनं वर्तवला आहे.

**हा होता आजचा पुणे वृत्तांत. उद्या पुन्हा भेटू विविध भारती पुणे केंद्रावर, संध्याकाळी सहा वाजता, ताज्या पुणे वृत्तांतमध्ये, नमस्कार.**